**Corporate Communications & Investor Relations**
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE:-020 25614495, 25614366, 25514501 to 12 Extn.

# <u>वृत्तपत्रीय निवेदन</u>

## श्री रोहित ऋषि यांनी बँक ऑफ महाराष्ट्रचे नवीन कार्यकारी संचालक म्हणून कार्यभार स्वीकारला



**पुणे,01 नोव्हेंबर 2023:** श्री रोहित ऋषि यांनी आज दिनांक 01 नोव्हेंबर 2023 रोजी बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक म्हणून कार्यभार स्वीकारला. बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये रुजू होण्यापूर्वी श्री रोहित ऋषि हे इंडियन बँकेत नवी दिल्ली येथे कार्यक्षेत्रीय सरव्यवस्थापक (एफजीएम) म्हणून कार्यरत होते. श्री रोहित ऋषि यांना बँकिंग क्षेत्रातील विविध पदांवर 28 वर्षे काम करण्याचा अनुभव आहे.

श्री रोहित ऋषि यांचे शिक्षण बी.टेक(टेक्स्टाइल), एम.बी.ए(फायनान्स) झाले असून त्यांनी सी.ए.आय.आय.बी परीक्षा देखील उत्तीर्ण केली आहे. बँकिंग क्षेत्रातील विविध प्रकारच्या कामाचा अनुभव व प्राविण्य त्यांनी प्राप्त केले आहे. इंडियन बँकेत 1995 सालापासुन औद्योगिक विकास अधिकारी म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरवात केली. त्यांनी आपल्या कारकीर्दीच्या प्रवासात डिजिटल परीचालनात्मक चौकटी व नाविन्यपूर्ण उपाययोजना यांचा स्वीकार करून शाश्वत स्वरुपाची वाढ करणे व भारतीय बाजारपेठेतील विविध घटकांच्या विविध प्रकारच्या गरजाची पूर्तता करणे शक्य असल्याचे दाखवून दिले आहे. आपल्या कारकिर्दीत विविध भूमिकेत ते कार्यरत असलेल्या संस्थेच्या वाढीत आणि परिवर्तनात महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

एमएसएमई, मिड-कॉर्पोरेट व कॉर्पोरेट क्रेडीट मध्ये श्री रोहित ऋषि यांचा दांडगा अनुभव असून संतुलित व सुरक्षित वित्तीय वातावरण निर्मिती सोबतच कॉम्प्लेक्स विनियमातून मार्ग काढून बहुविध उद्योगांना देण्यात येणाऱ्या कर्जाबाबत धोरण व नीती तयार करण्यामध्ये त्यांच्या या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ झाला आहे. विविध योजनांचे विकसन करण्याच्या क्षेत्रात त्यांना दांडगा अनुभव असून ग्राहकांच्या वाढणाऱ्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांनी अनेक नवीनतम योजना तयार करून व्यापक स्तरावर कार्यान्वित केल्या आहेत.

श्री रोहित ऋषि यांची बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक म्हणून झालेली नियुक्ती हा बँकेच्या प्रवासातील एक महत्वाचा घटक असून त्यांच्या व्यापक अनुभवाचा व व्यावसायिक कौशल्याचा बँकेच्या नेतृत्वाला लाभ होईल. त्यांच्या अनुभवाचा व कौशल्याचा उपयोग करून घेण्यास बँक उत्सुक असून त्यामुळे बँक यशाची नवीन शिखरे पादाक्रांत करील असा विश्वास वाटतो.

*****************************